महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२
शाखा उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी अधिकारी (भूसंपादन),अमरावती
दुरध्वनी क्रमांक - ०७२१-२६६१६०२ फॅक्स क्र. ०७२१-२६६२८४३
Email :- amravatilao2014@gmail.com Website:-http://amravati.nic.in

क्र.अ.का/प्र.अ./भूसंपादन/कावि/८५५ /२०२१ दिनांक :-१७ /१२/२०२१

आदेश

विषय :- भू.सं.प्र.क्र. ०५/४७/२०१८-१९ मौजा खेल खुशाल कुऱ्हा ता.चांदूर बाजार जि.अमरावती प्रकरणामध्ये भूसंपादन कार्यवाही करीता मुदत वाढ मिळणेबाबत.

संदर्भ :-१.भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३
२.नविन भूसंपादन कायदा २०१३ चे कलम २५ चे परंतुक
३.आपले कार्यालयीन पत्र क्र.मं.अ/विभूसंअ/(अवप्र)क्र.२/कावि १२२/२०२१, दि. १४/१२/२०२१

ज्याअर्थी, उपरोक्त विषयांचे अनुषंगाने, बोर्डी नाला प्रकल्पाच्या कामाकरीता एकुण क्षेत्र ३.०१ हे.आर खाजगी जमिन संपादित करणेकरीता मौजा खेलखुशाल कुऱ्हा ता.चांदूर बाजार जि.अमरावती अंतर्गत कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती यांचेकडील भूसंपादन प्रकरण क्र. ०५/४७/२०१८-१९ मौजा खेलखुशाल कुऱ्हा ता.चांदूर बाजार जि.अमरावती हया प्रकरणामध्ये भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ११ अधिसूचना दिनांक ०९/०९/२०२० ला प्रसिध्द करण्यात येऊन तद्नंतर कलम १९ अधिसूचना दिनांक २३/१२/२०२० ला प्रसिध्द करण्यात आली. कलम २१ (१) (२) च्या नोटिस काढुन संबंधित सर्व भूधारकांना बजावण्यात आल्या तसेच अधिसूचना प्रसिध्दी नंतर संबंधित यंत्रणेस प्रकरणामध्ये लागणारा एकुण अंदाजित निधी १,१७,००,०००/- प्राप्त झाला.

उपरोक्त प्रकरणामध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी यांना वारंवार अंतिम निवाडयामध्ये वनझाडे मुल्यांकनाची मागणी करण्यात आली परंतु अद्यापही चंदनाच्या झाडांचे मुल्यांकन प्राप्त झाले नसल्यामुळे प्रकरणामध्ये अंतिम निवाडयाची कार्यवाही करता आली आहे. सदर प्रकरण कलम १९ च्या घोषणापत्राच्या अंतिम प्रसिध्दीनुसार दि. २३/१२/२०२१ रोजी प्रारुप निवाडा स्तरावर व्यपगत होत आहे.

ज्याअर्थी, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ चे कलम २५ चे तरतुदीमधील परंतुकानुसार समुचित शासन कलम १९ चे प्रसिध्दीनंतर निवाडा जाहिर करण्याबाबतचा १२ महिन्यांचा कालावधी योग्य कारणांसह पुढे वाढवू शकते, अशी तरतुद आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची दिनांक ११/०९/२०१५ चे राजपत्रकात प्रसिध्द अधिसूचना क्र.संकिप ११/२०१४/प्र.क्र.७७(भाग२)/अ-२, दिनांक ११/०९/२०१५ नुसार जिल्हाधिकारी यांना १०००० हे.आर क्षेत्रापर्यंतचे क्षेत्रापेक्ष जास्त नसलेला भूसंपादनासाठी समुचित शासन म्हणून घोषित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, सर्व बाबीमुळे प्रकरणामध्ये मुदतवाढ मिळणे आवश्यक असल्याचे संबंधित यंत्रणा तसेच उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र.२,अमरावती त्यांचेकडुन भूसंपादन कार्यवाहीस मुदतवाढ मिळणेकरीता विनंती करण्यात आली.

त्याअर्थी, आता, उपरोक्त प्रकरणामध्ये वरीलप्रमाणे, विनंती केल्यानुसार व उक्त वस्तुस्थितीनुसार भूसंपादन अधिनियम २०१३ मधील कलम २५ अंतर्गत तरतूदीनुसार भूसंपादन कार्यवाही करीता समुचित शासन म्हणून कलम १९ चे प्रसिध्दीनंतर निवाडा जाहिर करण्याची मुदत (१२ महिने) संपल्यानंतर निवाडा जाहिर करण्यास्तव दिनांक २३/१२/२०२१ नंतर पुढील १२ महिनेपर्यंत मुदतवाढ प्रदान करीत आहे. याबाबत सर्व संबंधितांनी योग्य कार्यवाही करावी .

**सोबत** :- भू.सं.प्र.क्र०५/४७/२०१८-१९ मौजा खेलखुशाल कुऱ्हा
ता.चांदूर बाजार जि.अमरावती

**समुचित शासन तथा**
**जिल्हाधिकारी अमरावती**

**प्रति,**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),**
**अ.व.प्र.क्र.२, अमरावती**

**प्रतिलिपी** :- १. मा.विभागीय आयुक्त,अमरावती यांना माहिती करीता सविनय सादर.
२. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग, अमरावती यांना माहिती करीता.
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांना माहिती तसेच मुल्यांकन उपलब्ध करुन देणेचे निर्देशासह कार्यवाही करीता.

**समुचित शासन तथा**
**जिल्हाधिकारी अमरावती**

**प्रकरण/पत्र/निवेदन**
दि.२१/१२/२१ रोजी प्राप्त झाले.
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
अ.व.प्र.क्र.२, अमरावती